# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-६८ दिनांकः- १९/०३/२०२१

## १७ वर्षांपासून गुन्हयात पाहिजे असलेल्या आरोपीतास गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा कडून अटक

मा. पोलीस आयुक्त सो, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी गुन्हयांना आळा बसविण्यासाठी पाहिजे व फरारी आरोपीतांचा शोध घेण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक ०५/०२/२००४ रोजी ०४.०० ते ०५.१५ वा.चे. सुमारास भारती ज्वेलर्स दु.नं. ३, से.नं. ४-ए-९ शांतीनगर मिरारोड पुर्व येथे अनोळखी आरोपींनी दोन वॉचमेन यांना चाकु व रिव्हॉल्वरचा धाक दाखवुन शटरचे कुलुप तोडुन शटर उचकटुन आत प्रवेश करुन दुकानातील लोखंडी तिजोरी तोडुन सोन्याचे दागीणे व रोख रक्कम असा २९,६३,४८७ रु. किमतीचा माल जबरीने चोरुन नेले बाबत **मिरारोड पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. I ४५/२००४, भा.द.वि. कलम ३९२,४१२ आर्म ॲक्ट ३,२५** अन्वये दाखल गुन्हयातील पाहीजे आरोपीत **भुशीसिंग ऊर्फ दिपकसिंग चोनासिंग टाक वय-३६ वर्षे** हा भिवंडी येथे येणार असल्याची गुन्हे शाखा युनिट-२ काशिमिरा यांना माहिती मिळाल्याने आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक पाठविण्यात आले होते.

त्याप्रमाणे गुन्हे शाखा युनिट-२ काशिमिरा पथकाने पाहिजे आरोपीत भुशीसिंग टाक याचा शोध घेवून त्यास दिनांक १८/०३/२०२१ रोजी अटक केली आहे. सदरचा आरोपी हा गुन्हे अभिलेखावर सराईत गुन्हेगार असून त्याचे वर खुन,दरोडा,जबरीचोरी,चोरी,घरफोडी, अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. तसेच सदर आरोपी विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगार नियंत्रण अधिनियम सन १९९९ (मोक्का) अंतर्गत गुन्हा दाखल आहे.

सदरची कामगिरी मा. श्री सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मिरा.भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय, मा. श्री. एस. जयकुमार, अपर पोलीस आयुक्त, मा.श्री. डॉ.महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. अविराज कुराडे पोलीस निरीक्षक गुन्हे प्रकटीकरण शाखा-१, यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पो.निरी. विलास कुटे, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सहा.पो.उप-निरी. राजु तांबे,पोहवा/३६ संदिप शिंदे, पोहवा/२२१७ किशोर वाडिले, पोहवा/११०९ अविनाश गर्जे,पोना/३०८ पुष्पेंद्र थापा, पोना/१६४४ सचिन सावंत तसेच पो.शि./३३७५ राजेश श्रीवास्तव, /पो.शि./३५०२ सतिष जगताप, पो.शि./३६८७ विकास राजपुत, पो.शि./१८६८ महेश वेल्हे, पो.शि./३५७९ सुशिल पवार सर्व नेम. गुन्हे प्रकटीकरण शाखा-१ यांनी केली आहे.

Scanned with CamScanner